## वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय

विषय : दि.१.८.२००९ ते ३१.७.२०१० पर्यंत महालेखाकार नागपूर यांनी केलेले लेखापरिक्षण.

क्रमांक : कक्ष-३/ऑडिट/1381 /१०-११
नागपूर दिनांक २६/10/10

प्रति,
वरीष्ठ लेखा अधिकारी,
महालेखाकार (लेखापरिक्षा) द्वितीय,
महाराष्ट्र, नागपूर

संदर्भ : आपले पत्र क्र.वेटिंग-II/नि.री. अहवाल/खर्च/महसूल/२०१०-११/ ग्रुप-IX/१२७, दि.२८.९.२०१०.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपणाकडून निरीक्षण अहवाल प्राप्त झाला असून त्यातील भाग २ (ब) मधील परिच्छेद क्र. १ चे सविस्तर उत्तर सहपत्रासह सादर करण्यांत येत आहे. परिच्छेद क्रमांक २ चे सविस्तर उत्तर सोबत जोडले आहे. तसेच परिच्छेद क्रमांक ३ चे सहपत्र सोबत जोडलेले आहे.

तरी वरील तिनही परिच्छेदाचे अनुपालन अहवाल विचारात घेता सदरचे परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.

सहपत्र : वरील प्रमाणे

वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक
पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर

सा/- शार्किल
माहिती अधिकारी
तथा
सहाय्यक वनसंरक्षक
सेलू यूनिट, नागपूर

12

## Audit - Part II(B) :- Para 1
## Irregular allotment of work to NGO

उत्तर खालील प्रमाणे विषद करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे पत्र क्र.महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचे शासन क्र.डब्ल्यूएलपी/१०-०९/प्रक.१६८/फ-१/ मुंबई, दि.२१.८.२००९ अन्वये राज्य शासनाचे खालील उल्लेखित कामाकरीता अनुदान प्राप्त झाले. सोबत शासन निर्णयाची प्रत आपले अवलोकनार्थ जोडण्यात येत आहे.

| | | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | बोर (वन्यजीव) अभयारण्यातील बालोद्यानात स्वागत कक्षाचे बांधकाम करणे | ४,२७,५९९ |
| २ | बोर (वन्यजीव) अभयारण्यातील बालोद्यानात संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे | ४,८८,५२१ |
| | एकुण | ९,१६,१०१ |

वरील काम ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र दत्तपूर वर्धा यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-५/तां/वसं/वजी/१८१९/०९-१०, नागपूर, दि.१०.११.२००९ अन्वये प्राप्त अंदाजपत्रक व प्रकाशास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली व त्यांनी सादर केलेला MOU स्वांक्षाकित करुन पाठविण्यात आला व कामास सुरुवात करण्याचे आदेश देण्यात आले.

सदर कामास मंजूरी प्रदान करतांना खालील बाबी लक्षात घेण्यात आल्यात.

७. त्यांचे संस्थेला देण्यात आलेले प्रमाणपत्र जसे : हॉऊसिंग आणि अर्बन डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमीटेड, मुंबई क्षेत्रीय कार्यालय मुंबई, दि.२५.३.२०१०. (A)

८. विविध संस्थांची करण्यात आलेली काम जसे: संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान.

९. आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन मा. एम.एच. सावंत उपसचिव मुंबई, दि.३०.७.२००८ अन्वये शिफारस केलेल्या पत्राची प्रत. (B)

१०. सुप्रीटेडेन्ट ईंजीनीअर व्हीजीलन्स आणि क्वालिटी कंट्रोल सर्कल (पी.डब्ल्यू) नागपूर यांनी दि.३.२.१९९७ अन्वये दिलेले प्रमाणपत्र या प्रमाण पत्रात त्यांनी इकानामिकल तथा मड हॉऊसचे बांधकामाची टेक्नालाजी चांगल्या प्रकारे विकसीत केल्याचे नमुद केले आहे.

११. ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र दत्तपुर वर्धा यांनी जसे: हैद्राबाद, दिल्ली, मध्यप्रदेश, सी.आय.डी.सी.ओ. मुंबई इत्यादि ठिकाणी कामे करुन सामान्य किंमतीत केलेल्या बांधकामाच्या टेक्नालॉजीचा दांडगा अनुभव व्यक्त केला आहे.

१२. विविध प्रस्तावाची माहिती.

सदर संस्थेचा दांडगा अनुभव लक्षात घेऊन कामे करण्याची मान्यता देण्यात आली. या विभागाकडे अभियांत्रीकी शाखा नसल्याने व एकच उपवनअभियंता यांचे पद असल्याने

सा. क्षांकित

माहिती अधिकारी
तथा
सहाय्यक वनसंरक्षक
सेलू युनिट, नागपूर

(12)

बरीच प्रस्तावित बांधकामाचे अंदाजपत्रक व नकाशे वेळीच तयार करता येत नाही. तथा मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.,नागपूर यांचे दि.११.२.१९९३ च्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे कार्यवाही करणे. ३१ मार्च चे आत शक्य होत नाही म्हणून बरेचशी कामे त्या वित्तीय वर्षात पुर्ण करण्याचे दृष्टिने सदर संस्थेस देण्यात येतात अन्यथा प्रस्तावित कामाचे अनुदान शासनास परत करणे भाग ठरते. याकडे आपले लक्ष केंद्रीत करण्यात येते.

सदर संस्थेशी MOU जेव्हा स्वाक्षांकित करण्यात आला तेव्हा त्यात VAT, Incometax, surcharge & Royalty ची अट नसल्याने सदर कार्यवाही करता आली नाही. व सदर संस्थेला यापासुन सुटे असल्याने आपण दाखविलेली रक्कम रुपये.

4. @ IT.2 % 21, 070/- with Sucharge
5. VAT 4 % 36, 644
6. Royalty 2,552

कपात करता आली नाही. यापुढे यासंबंधात कार्यवाही करण्यात येईल. या विभागा मार्फत केलेली कामे ही महानगरपालिका, नगरपालिका तसेच ग्राम पंचायत यांचे कार्यक्षेत्रातील नसून केवळ वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील आहेत. त्यामूळे सदर संस्थेला कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थाचे कर लागु होत नाही. असे सदर संस्थेने त्यांचे पत्र क्र.ग्राविके/ हॉकरिंग/०९-१०/८८/वर्धा, दि.१४.१२.०९ अन्वये कळविले आहे. ©

| Sr.No | Date | Voucher No | Amount |
|---|---|---|---|
| 1 | 30.11.09 | 9 | 549661/- |
| 2 | 30.11.09 | 13 | 274830/- |
| 3 | 30.11.09 | 10 | 91610/- |
| | Total | | 916101/- |

वरील प्रमाणे कामाची रक्कम तसेच ०९-१० या वित्तीय वर्षात प्राप्त अनुदान हे ३१ मार्च २०१० पर्यंतच खर्ची घालावयाचे असल्याने वरील प्रमाणे रक्कम सदर संस्थेला पुर्णपणे देण्यात आली ६०%, ३०%, १०% प्रमाणे देण्यात आली असती तर शासनास अनुदानाची ४०% रक्कम परत करावी लागली असती व नमुद कामे करता आली नसती. या कार्यालयाचे अधिकाराचा वापर करुन दि.३१.३.२०१० ते ३०.९.२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यात शासनाचे हिताने काम पुर्ण व्हावे हा दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. अन्यथा कोणतीही संस्था अटीतटीचे भुमिकेनुसार कामे पुर्ण करु शकत नाही. असे या कार्यालयाचे मत आहे.

तरी कृपया सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती. त्याच प्रमाण विस्तृत माहिती सहपत्रासह सादर करण्यात येत आहे.

माहिती अधिकारी
तथा
सहाय्यक वनसंरक्षक
सेलू युनिट, नागपूर

२) ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपुर वर्धा ही एक चॅरिटेबल ट्रस्ट म्हणून करीत आहे. वरील संस्था Rural Technology आणि Low Cost Housing या करीता नाविन्यपुर्ण संस्थेने तंत्र विकसित केलेले आहे. वरील संस्थेचे तंत्र ईको फ्रेंडली असून ते " क्रोनिकल टाईल्स व मड वॉल" या तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रचलित दरापेक्षा ४०% टक्के कमी दराने सदर संस्था बांधकाम करीत आहे. वरील संस्थेने हे तंत्र विकसीत केल्यामुळे, पुर्ण भारतभर हे तंत्रज्ञान इतर कुठल्याही कंत्राटदार किंवा इतर संस्थेकडे उपलब्ध नाही. तसेच भारत सरकारचे उपक्रम हॉऊसिंग आणि अर्बन डेव्हलपेंट कॉर्पोरेशन लिमीटेड, हुडको यांच्या "बिल्डींग सेंटर" म्हणून काम करतात. तसेच ईको टुरिझम यांच्या मध्ये जास्तीत जास्त स्थानिक तंत्राचा वापर करुन ईको फ्रेंडली बांधकाम असावे असे केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचना आहे. ज्याअर्थी या संस्थेचे वरील तंत्रज्ञान इतर कुठल्याही संस्थेकडे उपलब्ध नाही. त्यामूळे बी-१ निविदा फॉर्म चा उपयोग झाला नसता. बी-१ करीता लागणारा खर्च शासनाचा पुर्णत: वाया गेला असता. वरील तंत्रज्ञान हे ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र दत्तपुर, वर्धा यांनी विकसित केल्यामुळे त्याची तांत्रीक तपासणी वनविभागाचे अभियंता कडून करुन घेणे शक्य नव्हते आणि त्यामुळे वेगळयाने तपासणी करण्यात आली नाही. परंतू वरील तंत्रज्ञान यांच्या बद्दल Suprintendent Engineer Vigilance & Quality Control Circle(PWD), Nagpur यांनी प्रमाणपत्र जारी करुन वरील कामे शासकिय बील्डींग च्या कामाकरीता वापर करण्यात येऊ शकते हा तंत्रज्ञान Cost effective, strong & durable, thermally efficient, energy saving, require low maintenance अंदाजपत्रकीय देखरेख खर्च कमी आहे. असे सुध्दा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. (D)

वरील उल्लेखित कारणामुळे ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपुर, वर्धा या संस्थेकडून MOU करुन कामे करण्याचे आदेश त्यांना देण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचे उपक्रम सिडको, वेगवेगळे जिल्हा परिषद, आदिवासी विकास, भारत सरकार येथील संस्था यांनी सुध्दा अशी पध्दत अवंलबुन ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र दत्तपुर, वर्धा यांना वेगवेगळया प्रकारची बांधकामे देण्यात आली आहेत.

ग्रामोपयोगी विज्ञान केंद्र, दत्तपुर, वर्धा ही एक चॅरिटेबल संस्था असून त्या संस्थेचे ऑडिट मान्यता प्राप्त ऑडिट संस्थेकडून केल्या जाते त्याचे जे काही Income Tax, VAT इत्यादि शासनाला स्वत: जमा करुन व त्याचे पेंमेंट सुध्दा चॅरिटेबल कमीशनरला सादर करतात. Income Tax व VAT त्यांना आयकर अधिनियम कलम १२ (A) नुसार त्यांना लागू होत नसल्यामुळे रितसर



साक्षांकित
माहिती अधिकारी
तथा
सहाय्यक वनसंरक्षक
सेलू यूनिट, नागपूर

आयकर विभागाला जी रक्कम दुस-या विभागाकडून कापण्यात येते ती त्यांना परत करण्यात येते. त्यामुळे Income Tax व VAT कपात करण्यात काही उपयोग झाला नसता. वरील कारणामुळे ही संस्था No loss, No Profit चॅरिटेबल म्हणून काम करणारी संस्था आहे. तरी फार कमी दरात चांगल्या प्रकारचे नैसर्गिक कामे केलेले आहे. ज्याअर्थी इतर कामे कुठलीही संस्था करु शकत नाही. त्यामुळे वर उल्लेखित बाबी लक्षात घेता सदर संस्थेला कामे देण्यात आलेली आहेत. त्यामूळे कृपया उपरोक्त परिच्छेद वगळण्यास विनंती करण्यात येत आहे.

वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक
पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर

माहिती अधिकारी
तथा
सहाय्यक वनसंरक्षक
सेलू युनिट, नागपूर